# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

दिनांक १६.१०.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १५/१०/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २२ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ११,०००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपराध दाखल :—**दिनांक १५/१०/२०२२ रोजी फिर्यादी सुमेध सदाशिव पठाडे रा.कानरखेडा बु ता.जि.हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे गोरेगाव येथे कलम ३०४ अ,२७९,३३७, भादवी प्रमाणे प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.०९.१०.२२ रोजी चे १४:३० वा चे सुमारास मौजे कन्हेरगाव ते कानरखेडा बु जाणारे रोडवर उत्तम महादजी भालेराव यांचे शेताजवळा आरोपीने त्याचे ताब्यातील ॲटो क्र एम.एच.२४ ई ९४२७ मध्ये यातील मयत व जख्मीस बसवुन ऑटो भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन ऑटो पलटी केल्यामुळे ॲटोतील प्रवाशी व फिर्यादी यांचा चुलता प्रभाकर अुर्जना पठाडे वय ६० वर्ष रा. कानखेडा बु यांचे मरणास कारणीभुत झाला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात गोरेगाव पोलीस तपास करित आहेत.